# दि मालेगांव मर्चन्टस् को ऑप बँक लि.

।। आपली बँक, आपली माणसं ।।

## ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा- सन २०२३-२४ च्या सभेची नोटीस

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, बँकेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०१.०९.२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी मा.चेअरमन अॅड.श्री. संजय दत्तात्रय दुसाने यांचे अध्यक्षतेखाली आय.एम.ए. हॉल, एल.आय.सी. ऑफिसच्या मागे, कॅम्परोड, मालेगांव जि.नासिक येथे आयोजित केली आहे. तरी या सभेस आपण सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२३/०९/२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. संचालक मंडळ यांनी तयार केलेला सन २०२३-२०२४ सालाचा कामकाजाचा अहवाल व आर्थिक तक्त्यांचा म्हणजे दि. ३१/०३/२०२४ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंदास मंजुरी देणे
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२३-२०२४ वर्षाच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०२२-२०२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.
५. सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
६. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकास व मागील वर्षी अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
७. सन २०२४-२०२५ करीता अंतर्गत तपासणीसांची नेमणूक केल्याची व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत.
८. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता मे. एसबीएच अॅन्ड कंपनी, पुणे यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून रिझर्व्ह बँकेकडून झालेल्या नेमणुकीस मंजुरी देणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
९. एकरकमी कर्जपरतफेड योजना तसेच राष्ट्रीय लोकअदालत अंतर्गत अहवाल वर्षात बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे.
१०. बँकेचे मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेऊन नोंद घेणे.
११. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली थकीत कर्जे, वसुलीचा हक्क कायम ठेवून खाते निर्लेखीत करणे.
१२. म.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी परवानगी दिलेल्या ४० गांव फाटा, लोणवाडे शिवार येथे स्थलांतरीत टिळक रोड शाखेसाठी खरेदी केलेल्या स्वमालकीच्या जागेची नोंद घेणे.
१३. म.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी परवानगी दिलेल्या बँकेच्या स्वमालकीच्या वर्धमान नगर शाखेलगतचे असलेले २ गाळे खरेदी केलेबाबतची नोंद घेणे.
१४. बँकेने खरेदी केलेल्या वर्धमान नगर शाखेच्या स्वमालकीच्या जागेवर अद्यावत फर्निचर व नुतणीकरण करणेबाबत.
१५. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर न राहु शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१६. म.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**दिनांक : १४.०८.२०२४**

| श्री. विरेंद्र उमाकांत होनराव | अॅड.श्री. संजय दत्तात्रय दुसाने |
|---|---|
| **जनरल मॅनेजर** | **चेअरमन** |

**विशेष सुचना :-**

१) कोरम अभावी सभा अर्धा तास तहकूब ठेवून त्यानंतर सभेचे कामकाज त्याच ठिकाणी विषय पत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यासाठी सुरू केले जाईल.
२) ज्या सभासदांना सभेत अहवाल वर्षातील कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.२६.०८.२०२४ अखेर कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी आणून देण्याचे करावे.
३) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या मुख्य कार्यालयात व शाखा कार्यालयात कामकाजाच्या वेळेत उपलब्ध आहे.
४) सन २०२३-२०२४ चा वैधानिक तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात पहावयास मिळेल.
५) कृपया सभेस येतांना ओळखपत्र व अहवालाची प्रत सोबत आणावी.